# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/महाडीबीटी पोर्टल/२०१८/4651 दिनांक :- 24 OCT 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सव तंत्रशिक्षण संस्था

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर शुल्काबाबतची माहिती भरणे बाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/१०/२०१८ रोजी सांगली जिल्हाची आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये मा.संचिव, शुल्क नियमाक प्राधिकरण यांनी महाडीबीटीमहाऑनलाईन पोर्टल/MahaDBTMahaOnline Portal द्वारे शुल्काबाबतची माहिती भरताना संस्थानी खालील प्रमाणे चूका केल्याचे निदर्शनास आणुन दिले.

१. अभ्यासक्रमांचे वर्ष नमुद केलेले नाही.
२. शिक्षण शुल्क समिती/एफआरए यांनी शिक्षणशुल्क निश्चित केलेल्या मिटींगच्या तारखा चुकीच्या नमुद केलेल्या आहेत.
३. फी बाबतची कागदपत्रांना वर्षनिहाय / शुल्कनिहाय योग्य नावे दिलेली नाहीत.
४. शैक्षणिक वर्ष २०१६ पासुन द्वितीय वर्षाकरीता शुल्कवाढ लागु नसतानाही शुल्कवाढ केलेली आहे.
५. सर्व वर्षांकरीताचे शुल्क मंजुरीसाठी सादर केलेले नाही.
६. एकाच बॅचच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळे शुल्क भरण्यात आले आहे.

**पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, संस्थांनी मंजुर शुल्कापेक्षा कमी शुल्क भरले असल्यास २०१५ च्या अधिनियमातील तरतुदी नुसार संस्थेने मान्य शिक्षण शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारले असल्याने ते मंजुर करण्यात आले आहे. आपल्या संस्थेचे शुल्क महाडीबीटीमहाऑनलाईन पोर्टल/MahaDBTMahaOnline Portal द्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी सादर करताना वरीलप्रमाणे चुका होणार नाहीत व ते बिनचुक असेल याबाबत दक्षता घेण्यात यावी.**

२३.१०.१८

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे